पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/९/कावि/ ४७१/१०
दिनांक - ८ / ४ /२०१०

प्रति,
मा.............................................
सदस्य, महिला व बाल कल्याण समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८

विषय :- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बाल कल्याण समितीची मासिक सभा दिनांक १५/०४/१० रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बाल कल्याण समितीची मासिक सभा गुरुवार दिनांक १५/०४/१० रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत :- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

मा. महिला व बाल कल्याण समिती

<u>कार्यपत्रिका क्रमांक - १०</u>

दिनांक :- १५/०४/१० वेळ :- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बाल कल्याण समितीची मासिक सभा गुरुवार दिनांक १५/०४/१० रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

दिनांक १०/३/२०१० व २९/३/२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ९) सभावृत्तांत कायम करणे.

विषय क्रमांक :- १) मे.मॅक्स टेलीकॉम एज्युकेशन सोसायटी (एम.टेल) पुणे या संस्थेस ३१ मार्च २०१० पर्यंत अखेरच्या कालावधीकरीता प्रस्तावासोबत जोडलेल्या प्रपत्र अ मध्ये नमुद केलेल्या प्रशिक्षणाचे जास्तीत जास्त ८०० लाभार्थी (प्रशिक्षणार्थी) या संख्येच्या मर्यादेत प्रशिक्षण योजना मनपाने निश्चित केलेल्या केंद्रामार्फतच प्रशिक्षण हे महिलांच्या मागणीनुसार व वेळेत राबविणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दि.१५.०४.१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक :- २) पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील यो.क्र.१६ इयत्ता १२ वी नंतरचे वैद्यकिय (M.B.B.S),अभियांत्रिकी संगणक प्रथम वर्ष पदवी परीक्षा यासारखे उच्च शिक्षण घेणा-या युवतींना अर्थसहाय्य देणे या योजनेअंतर्गत प्रस्तावासोबतचे प्रपत्र अ प्रमाणे ०६ लाभार्थींना प्रत्येकी र.रू.७५००/- प्रमाणे एकत्रित र.रु. ४५,०००/- अदा करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- ३) पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील यो.क्र.०३ मुलींना तांत्रिक प्रशिक्षणाकामी अर्थसहाय्य देणे या योजने अंतर्गत अर्चना बाळासाहेब धायगुडे यांना र.रु.२,०००/- अदा करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- ४) पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील मुलींना यो.क्र.१० खाजगी क्लासची फी देणेकामी अर्थसहाय्य देणे या योजनेअंतर्गत प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ प्रमाणे २३ लाभार्थींना प्रत्येकी र.रु.१,०००/- प्रमाणे एकत्रित र.रु.२३,०००/- अदा करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- ५) सन २००८ - ०९ या आर्थिक वर्षात यो.क्र.१५ पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील परदेशी उच्च शिक्षण /प्रशिक्षण घेण्या-या युवतींना अर्थसहाय्य देणे या योजनेअंतर्गत ऐश्वर्या अशोक कोटस्थाने व रिमा विजय देवधर यांनी MBA या अभ्यासक्रमासाठी लंडन स्कुल ऑफ मार्केटिंग, लंडन या ठिकाणी प्रवेश घेतला असल्याने योजनेच्या अटी व शर्तीनुसार दोन्ही अर्ज पात्र झाले असल्याने त्यांना प्रत्येकी र.रु.१,००,०००/- याप्रमाणे विद्यापीठाचे नावे अदा करण्यास व त्याकामी येणा-या र.रु. २,००,०००/- चे प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस/९/कावि/४७१/२०१०
दिनांक :- ८/४/२०१०
टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.